लोकमत

# हिवाळी सत्रात ३१६८ विद्यार्थ्यांनी दिल्या १६ परीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या ३१६८ विद्यार्थ्यांनी एकूण १६ परीक्षा शनिवारी वर्णनात्मक पद्धतीने विविध महाविद्यालये व अधिविभागामध्ये दिल्या.

या परीक्षांसाठी एकूण ३१६८ विद्यार्थी उपस्थित होते. बीटेक, बीएबीएड, बीसीए, एमए, एमकॉम, एमएसीए, एमएस्सी, एमबीए, एमएसडब्ल्यू, डिप्लोमा इन टॅक्सेशन, पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, नॅनो सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी, व्हॅल्युएशन ऑफ रिअल इस्टेट अशा एकूण १६ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने पार पडल्या, असे डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले.

तरुण भारत

## थोडक्यात महत्त्वाचे

# विद्यापीठातील स्थगित परीक्षेचे वेळापत्रक संकेतस्थळावर प्रसिद्ध

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठअंतर्गत ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२२ हिवाळी सत्रातील १० अभ्यासक्रमाच्या परीक्षा शनिवारी सुरळीत पार पडल्या. या परीक्षेसाठी ८५५ विद्यार्थी बसले होते. परीक्षेतील गैरप्रकार टाळण्यासाठी भरारी पथकांची नियुक्ती केली आहे. २, ३ आणि ४ फेब्रुवारीच्या स्थगित परीक्षांचे सुधारीत वेळापत्रक संकेतस्थळावर प्रसिद्ध केले आहे. तरी विद्यार्थ्यांनी संकेतस्थळाला भेट देऊन आपआपल्या विषयाची परीक्षा द्यावी, असे आवाहन शिवाजी विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक अजितसिंह जाधव यांनी केले आहे.